वाचा:-१. महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७,

२. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.एमआयएस १०८९/सीआर/२४८/८९/१३,(एक), दि.२१/०७/१९८९

३. ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही १०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दि. ०२/०५/१९९८

४. ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.नियुक्ती १०९३/प्र.क्र.२९५१/१४, दिनांक २० मे, १९९९

५. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२०११/३९, दिनांक १९/०३/२००३

६. ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शा.नि. क्र.एपीटी-१००१/प्र.क्र.९६०/आस्था-८ दि. २७/६/२००३,

७. महाराष्ट्र शासन राजपत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ०३२ दिनांक २ फेब्रुवारी २००६

८. शासन निर्णय क्र.प्रानिमं -२००७/प्र.क्र. ४६/०७/११३-अ दि. १९/१०/२००७,

९. शासन निर्णय.क्रं.असक-१०१०/प्र.क्रं.१/२०१० वित्तीय सुधारणा-१ दि.५ जुन २०१०

१०. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. सीबीसी १०/२०१० प्र.क्र.५९०/मावक-५ दिनांक ०८ जुन २०११

११. शासन निर्णय.क्र.डिएसआर-२०१९/प्रक्र-१६/आस्था-५/दि ०६/०३/२०१९,

१२. शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ,दि.०४ मे २०२२,

१३. मा.सहाय्यक आयुक्त (मावक) नाशिक यांचेकडील बिंदुनोंदवही तपासणी दि.२५/११/२०२२,

१४. शासन निर्णय क्र. वेपुर ११२१/प्रक्र.०४/सेवा-९/ दि १३/०२/२०२३,

१५. म.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.संकिर्ण-२०२२/प्र.क्र.११/आस्था-८,दि.१२ मे २०२३,

१६. जिल्हा परिषद जळगांव विविध संवर्गाची पद भरती जाहिरात क्र ०१/२०२३,

१७. आय.बी.पी.एस. कडून प्राप्त निकाल व त्यानुसार प्रसिध्द तात्पुरती निवड व प्रतिक्षाधिन यादी,

१८. जि.प.जळगांव सरळसेवा पदभरती २०२३ कागदपत्र पडताळणी दि १९/०६/२०२४ व २०/०६/२०२४

१९. गुणवत्तेनुसार प्रसिध्द अंतिम निवड यादी व जिल्हा निवड समिती इतिवृत्त.

२०. समुपदेशन दिनांक २२/०७/२०२४

---

**नेमणुक आदेश**

जाक्र/बांध./आस्था-२/आरआर/९३१ /२०२४.
बांधकाम, विभाग, जिल्हा परिषद, जळगाव.
दिनांक :- २३/०७ /२०२४.

उपरोक्त वाचा मध्ये नमुद शासन संदर्भ नियम, जिल्हा निवड समिती इतिवृत्त, प्रसिध्द जाहिरात अटी व शर्ती त्यात नमुद नियम, आय.बी.पी.एस. कडील प्राप्त गुणवत्ता यादी व महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ नुसार मला असलेल्या अधिकारांचा वापर करून, मी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जळगाव, खालील नमूद उमेदवार यांना जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-तीन) श्रेणीमधील **स्थापत्य अभियांत्रिकी सहायक** या पदावर समय वेतनश्रेणी मॅट्रीक्स **एस - ८ (रु.२५५००-८११००)** या वेतन संरचनेत खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीवर तात्पुरती नेमणूक करीत असून त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयात रिक्त पदी पदस्थापना करीत आहे. सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व आस्थायी स्वरूपाची आहे.

| अ. क्र. | गुणवत्ता यादी क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | उमेदवाराचा मुळ जात प्रवर्ग | निवडीचा जात प्रवर्ग | पदस्थापीतकेलेले पद व कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६४९ | **भावेश सुरेश पाटील**<br>**ढाके वाडा, भादली बु. ता. जि. जळगाव** | वि.जा.अ. | वि.जा.अ दिव्यांग (LV). | **जलसंधारण उप विभाग (ल.पा.) चोपडा** |

**सदरची नेमणूक खालील अटी व शर्तीवर करण्यात येत आहे.**

१) सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारांस नोटीसी शिवाय कोणतेही कारण न दाखवता केव्हाही जिल्हा परिषद जळगावचे सेवेतून कमी करण्यात येईल अशी आहे.

२) उपरोक्त नियुक्त उमेदवारांपैकी सामाजिक व समांतर आरक्षण अंतर्गत निवड व नेमणुक झालेल्या उमेदवारांची नेमणुक ही त्यांचे, त्यांच्या आरक्षणाची प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकरणाकडुन पडताळणीचे अधीन राहुन देणेत आली आहे. सदर पडताळणीत आक्षेपार्ह बाबी आढळुन आलेस त्या उमेदवारांची नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

३) सदर उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांका पासून तीस दिवसांचे आत नियुक्तीच्या कार्यालयात हजर होणे आवश्यक आहे. दिलेल्या मुदतीत हजर झाले नाहीत, तर त्यांची नेमणूक रद्द करणेत येईल.

४) सदर उमेदवारास सदर नेमणुकीच्या पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियुक्ती प्राधिकरणाकडेस एक महिन्याची आगावू नोटीस द्यावी अथवा एक महिन्याचा पगार नोटीसी ऐवजी जिल्हा परिषद, जळगावचे जिल्हा निधीत चलनाद्वारे जमा करून जमा चलनाची प्रत सादर केल्यावरच राजीनामा मंजूर केला जाईल. तसेच गैरशिस्त, सेवानियमांचा भंग इ.कारणांसाठी सेवा समाप्त करतांना वरील उमेदवारांना नोटीस देण्याचे जिल्हा परिषदेस बंधनकारक राहणार नाही. हे नोटीशीचे नियम यानंतर वेळोवेळी होणा-या नियमातील बदलांच्या अधीन राहतील.

५) वरील उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र / वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीय असलेस व राखीवजागेवर निवड झालेली असलेस) व सादर केलेले इतर कागदपत्र अवैध/चूकीचे आढळल्यास त्यांना जिल्हा परिषद सेवेतून कमी करणेत येवून त्यांचेविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

६) सदर नियुक्ती मिळणेपूर्वी उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेत असल्यास त्या पदांचा राजीनामा देणे आवश्यक आहे. तसे मंजूरीचे पत्र हजर होतांना सादर करावे. तसेच अश्या उमेदवारांनी सदर पदासाठी अर्ज करतांना सक्षम प्राधिकारी यांची मान्यता घेतली असलेस ती प्रत व कार्यमुक्तता प्रत हजर होतांना सादर करावी व शासन नियमानुसार विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन मुदतीत हजर व्हावे व तसा अहवाल सादर करावा.

७) सदर उमेदवाराची नेमणुक ही पोलीस अधिक्षक यांचेकडील पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी चे अधिन असुन प्रक्रिया ०१ महिन्याचे आत पदस्थापित विभाग प्रमुखांनी करावी. सदर पडताळणीत आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास सदर उमेदवारांची नेमणुक रद्द करण्यात येईल. कार्यालय प्रमुख यांनी तसा अहवाल संवर्गप्रमुख यांना वेळीच सादर करुन प्रक्रीया पुर्ण करावी. रद्द करणेत येईल.

८) नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्याकरिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

९) संबंधीत कार्यालय प्रमुखांनी सदर उमेदवारांना हजर करुन घेतांना त्यांची जन्मतारिख, शैक्षणिक अर्हता, वचन पत्र,इ. तसेच मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्रासह सर्व मुळ कागदपत्रे तपासणी करुन घ्यावीत. शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार सदर उमेदवारांना परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतन अंशराशीकरण नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना शासनाचे प्रचलित धोरणानुसार त्यांना लागु राहणार नाही. वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. रानियो-२०२२/प्र.क्र. ३४/सेवा-४, दि.३१ मार्च २०२३ नुसार उमेदवाराला विकल्प सादर करावयाचा आहे.

१०) सदर उमेदवारांनी नेमणुकीचे जागी हजर होतांना जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांचेकडून वैद्यकिय तपासणी करुन घेवुन जिल्हा परिषद सेवेतील नेमणुकीच्या पदावर सेवेसाठी शारिरीक दृष्टया पात्र असले बाबतचा वैद्यकिय दाखला पदस्थापित कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याबाबत संबंधीत कार्यालय प्रमुखांनी वेळीच योग्य ती कार्यवाही करावी.

११) उमेदवारांची नेमणूक एक वर्षाचे शिकावु कालावधीसाठी करणेत येत आहे. तथापी सदर कालावधीत त्यांचे कामकाज समाधानकारक नसल्यास कालावधी पुढे आणखी वाढविण्यात येईल.

१२) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत त्यांना जातीच्या प्रमाणपत्राचे वैधतेच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. उपरोक्त वाचा क्र. १० च्या शासन निर्णया नुसार **सदर उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्यांच्या आत** सादर करणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणत्राची तपासणी करून घेणे व त्यासाठी सर्व कागदपत्रांची पुर्तता करून देण्याची जबाबदारी सर्वस्वी संबधित कर्मचा-यांची राहिल. पडताळणीअंती जातीचे प्रमाणपत्र अवैध असल्याचे आढळून आले अथवा वैध प्रमाणपत्र मुदतीत सादर न केल्यास संबधित कर्मचा-यांची सदर पदावरील नेमणूक रद्द करून, त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या जातील याची नोंद घ्यावी. याबाबत प्रतिज्ञापत्र रू १००/ चे स्टॅम्पपेपरवर हजर होतेवेळी कार्यालय प्रमुखांकडे करून द्यावयाचे आहे.

१३) सदर उमेदवारांनी हजर झाले नंतरतीन महिन्यांचे आंत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हासेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम १७ चे तरतुदीनुसार विहित नमुन्यातील आवश्यक ते विवरणपत्र संबंधीत कार्यालय प्रमुखांचे समक्ष भरुनदेणे आवश्यक आहे. सदर विवरणपत्र संबंधीताच्या मुळ सेवा पुस्तकांत डकविण्यात यावे.

१४) वरील उमेदवाराला वेळोवेळी **निर्धारित शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहिल.** सदर उमेदवाराला महाराष्ट्र शासन राजपत्र ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ०३२ दिनांक २ फेब्रुवारी २००६ मधील तरतुदीनुसार विभागीय परीक्षा व शासन निर्णय/इतर प्रशिक्षण विभागीय परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण/पूर्ण करणे बंधनकारक राहील.

१५) शासनाने विहित केलेली संगणक पात्रता परीक्षा पास केलेलीनसलेस दोन वर्षाचे आंत उत्तीर्ण करणे बंधनकारक राहील. त्यांनी शासन विहित संगणक पात्रता धारण केली असल्यास मुळ प्रमाणपत्र हजर होतांना संबंधीत कार्यालय प्रमुखांकडे सादर करावे. व तशी नोंद सेवा पुस्तकात घेणेत यावी.

१६) शासनाचे निर्धारीत आकृतीबंधानुसार व शासनाचे अंतिम आढाव्यानुसार सदरचे पद कमी झाल्यास नेमणूक दिलेले उमेदवार नियमानुसार सेवेतून कमी करण्यास अथवा अन्य योग्य त्या पदावर समायोजन करण्यास पात्र राहातील

१७) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र, इतर वचनपत्र शासन निर्णयानुसार प्रमाणीत करून देणे बंधनकारक राहिल. सदरचे प्रमाणपत्र विहित नमून्यात घेवून मूळ सेवापुस्तकात नोंदविण्यात यावे.

१८) संबंधीत उमेदवारांनी हजर होतांना खालील नमुन्यात कार्यालय प्रमुखांकडे हमीपत्र भरुन देणे आवश्यक आहे. सदरचे हमीपत्र संबंधीताचे मुळ सेवापुस्तकात चिटकविण्यात यावे.

१९) सदर नियुक्ती ही मे. उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर येथे दाखल रिट याचिका क्र. १२१४१/२०१९ च्या निकालाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

**<u>हमीपत्र</u>**

मी---------------------------------राहणार------------------ हमीपत्र लिहून देतो/देते की, माझी जळगांव जिल्हा परिषदेच्या **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** या पदासाठी नेमणूक झालेली आहे. सदर नेमणूक ही पूर्णतः तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची असून माझी सेवा मला पूर्व नोटीस न देता अथवा त्यासाठी कोणतेही कारण न दाखविता कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येईल याची मला जाणीव असुन त्या तत्त्वावर मी नेमणूक स्वीकारीत आहे. सदर पदावर किमान ३ वर्ष सेवा पूर्ण केल्या शिवाय अन्य जिल्हा परिषमध्ये बदलीने नेमणूक बाबत मला अर्ज करता येणार नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. सदर आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून, सर्व अटींशी मी सहमत व बांधील आहे.

**समक्ष**

**कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी, हुद्दा व दिनांक** **उमेदवाराची स्वाक्षरी**

सदरचे आदेशाची नोंद सर्व संबंधीतांचे मुळ सेवापुस्तकांत घेण्यात येवून सदर आदेशांची शासन नियमांनुसार तातडीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. सदर आदेशा नुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**अंकित (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**

**प्रत.- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.**

१. संबंधीतांस पोष्टाव्दारे / ई-मेलव्दारे
२. म.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती जळगांव यांना सविनय सादर
३. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जळगाव यांना माहितीस्तव
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.जळगांव यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (साप्रवि) जि.प.जळगांवयांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना
६. आदेशात नमुद पदस्थापित कार्यालयाचे संबंधित खाते/विभाग प्रमुख यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाही करीता रवाना.

२/- उपरोक्त आदेशात नमूद अटीनुसार पूर्तता व योग्यत्या हमीपत्र व कागदपत्रांची पुर्तता करुन संबंधीतांना हजर करुन घेऊन कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

**अंकित (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव**